महाराष्ट्र शासन

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

जा.क्र. संवैशिवसं/ज्येष्ठ नागरिक प्रमागण्या/शै.वि.३/२०२५/३६९६. दिनांक १८.०६.२०२५

प्रति,
अधिष्ठाता,
सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये
सर्व शासकीय दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये

विषय : शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र. संवैशिवसं/ज्येष्ठ नागरिक/प्रलंबित मागण्या/अ-६/२०२३ दिनांक ०९.११.२०२३

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०५.२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने संचालनालयाने दिनांक ०९.११.२०२३ च्या (प्रत सलग्न) परिपत्रकान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य तपासणी करण्यात यावी तसेच ज्येष्ठ नागरिक तपासणीसाठी आभा कार्ड उपलब्ध करुन देणे, तपासणीमध्ये काही आजार आढळून आल्यास त्यावर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील अटी शर्तीनुसार मोफत उपचार देण्यात यावेत. तसेच ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षात घेवून आठवड्यातील दोन दिवस राखीव ठेवण्यात यावेत या बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

मात्र डॉ अण्णासाहेब शहाजीराव टेकाळे, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ यांनी दिनांक २०.०४.२०२५ च्या पत्रान्वये ज्येष्ठ नागरिकांना सुविधा पुरविण्यात येत नसल्याबाबत तक्रार सादर केली आहे.

तरी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधां पुरविण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयातील शैक्षणिक विभाग A Branch - dmerabranch@gmail.com येथे सादर करावा.

पुढे असेही नमूद करण्यात येते की, अशा प्रकारची तक्रार पुन्हा येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. अजय चंदनवाले)
संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई.

प्रत : मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मुंबई ४००००१